महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे – ४११००५
Email id: mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/९०५२
दिनांक : १२/०३/२०२१

## आदेश

विषय:- कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे सुधारित आदेश-लॉकडाऊन टप्प्याटप्प्याने उठविणे आणि या कालावधीत प्रतिबंधने कमी करणेबाबत (मिशन बिगिन अगेन).
पुणे महापालिका क्षेत्रामधील शाळा, शैक्षणिक संस्था, महाविद्यालये इ. बाबत सुधारित आदेश

संदर्भ:-
१) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,मंत्रालय मुंबई क्रमांक कोरोना २०२०/प्र क्र.५८/आरोग्य- ५, दिनांक १४ मार्च २०२०
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम,१८९७
४) महसूल व वनविभाग,महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DISM-1 दिनांक १७ एप्रिल २०२०, २१ एप्रिल २०२०,२९ जून २०२०,६ जुलै २०२०, ३१ जुलै २०२०, ३१ ऑगस्ट २०२०, ३० सप्टेंबर २०२०, १४ ऑक्टोबर २०२०, २३ ऑक्टोबर २०२०, ३ नोव्हेंबर२०२०, १४ नोव्हेंबर२०२०,२३ नोव्हेंबर २०२०, २७ नोव्हेंबर २०२०, २१ डिसेंबर २०२०, २९ डिसेंबर२०२०, १४ जानेवारी २०२१, , १० फेब्रुवारी २०२१
५) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/साप्रवि/२९२३, दि.३१.०७.२०२०,२९३४,दि.०३.०८.२०२०, ३७९१,दि.०२.०९.२०२०, ४६१५,दि.०१.१०.२०२०, ४८२३,दि.०९.१०.२०२०, ४८७४,दि.१३.१०.२०२०, ५१३५,दि.२१.१०.२०२०, ५१९६,दि.२४.१०.२०२०, ५३४२,दि.२९.१०.२०२०, ५३४५,दि.३१.१०.२०२०, ५४६७,दि.०५.११.२०२०, ५६४३,दि.१९.११.२०२०, ५९४७,दि.०१.१२.२०२०, ६६०८,दि.२२.१२.२०२०, ६८३८,दि.३१.१२.२०२०, ७१३९,दि.११.०१.२०२१, ७३५५,दि.१६.०१.२०२१, ७४५८,दि.२०.०१.२०२१, ७५४७,दि.२२.०१.२०२१, ७५७४,दि.२२.०१.२०२१, ७७८५,दि.०१.०२.२०२१, ८०२१, दि.०९.०२.२०२१,८२७४,दि.१८.०२.२०२१, ८३०८,दि.२१.०२.२०२१, ८५७७ दि.२८.०२.२०२१

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भ क्र. ४ मधील आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात निर्बंध शिथील व टाळेबंदी टप्प्याटप्प्याने उठविणे ( मिशन बिगिन अगेन ) संदर्भात कोविड – १९ या आजाराच्या प्रसारास प्रतिबंधीत करण्यासाठी उपाययोजना व मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

त्याअर्थी, महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड-१९ च्या प्रसारास पुणे महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे. साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा

२००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विक्रम कुमार, आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे महापालिका क्षेत्रामध्ये कोविड-१९ च्या प्रसारास प्रतिबंधित करण्यासाठी खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करीत आहे.

१) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील (Outside Containment Zone) सर्व हॉटेल, रेस्टोरंट, बार, फूडकोर्ट इ. आस्थापना त्यांच्या आसन क्षमतेच्या ५०% क्षमतेने रात्री १०:०० वाजेपर्यंत सुरु राहतील. तथापी अॅपद्वारे किंवा हॉटेलमार्फत पार्सल सेवा / घरपोच सेवा रात्री ११:०० वाजेपर्यंत सुरु राहील. सदर आस्थापनांनी त्यांच्या हॉटेल / रेस्टोरंट मधील ग्राहकांचे उपस्थिती बाबत दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधन कारक आहे. त्यांनी दर्शनी भागावर हॉटेलची एकूण आसन क्षमता आणि हॉटेल मध्ये उपस्थित ग्राहक यांची संख्या दर्शविणारा बोर्ड दर्शनी भागावर लावणे बंधनकारक आहे.

२) सर्व प्रकारांचे मॉल, सिनेमागृह, दुकाने (अत्यावश्यक वस्तू व सेवा वगळून उदा.मेडिकल) रात्री १०:०० वाजेपर्यंत सुरु राहतील.

३) रस्त्यांवरील खाद्यपदार्थांचे स्टॉल (टपऱ्या) व इतर ठिकाणी एकावेळी पाच लोकांची उपस्थिती अनुज्ञेय राहील. पाच पेक्षा जास्त लोकांची उपस्थिती आढळल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

४) महानगरपालिका क्षेत्रातील **सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळा, शैक्षणिक संस्था, महाविद्यालये यांचे नियमित वर्ग ३१ मार्च २०२१** पर्यत बंद राहतील. मात्र ऑनलाईन शिक्षणास मुभा राहील. इयत्ता १०वी व १२ वी च्या परीक्षा असल्यामुळे त्यांना या मधून वगळण्यात येत आहे.

५) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील (Outside Containment Zone) लग्न समारंभ व इतर सामाजिक, राजकीय, धार्मिक कार्यक्रम ५० लोकांच्या उपस्थितीत करणेस परवानगी राहील. तथापी, खुले मंगल कार्यालये/ लॉन्स/ मैदाने याठिकाणी १०० व्यक्तींच्या उपस्थितीत कार्यक्रमास परवानगी राहील. सदर नियमांचा भंग झाल्यास जागा मालकाविरुद्ध कारवाई करण्यात येऊन कार्यालय / सभागृह सील करण्यात येईल. अंत्यसंस्कार, दशक्रिया व त्याच्याशी निगडीत कार्यक्रम यांनादेखील हा नियम लागू राहील.

६) पुणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील (Outside Containment Zone) उद्याने सकाळी ०६:०० ते १०:०० या वेळेतच सुरु राहतील.

७) सोसायटीच्या आवारातील सोसायटीचे क्लब हाऊस दिनांक ३१ मार्च २०२१ पर्यंत बंद राहतील.

८) सर्व कोचिंग क्लासेस (MPSC, UPSC वगळून ) ३१ मार्च २०२१ पर्यंत बंद राहतील. MPSC, UPSC कोचिंग क्लासेस आसन क्षमतेच्या ५०% क्षमतेनुसार त्याकरिता निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना / अटींच्या आधीन राहून सुरु राहतील.

९) पुणे महानगरपालिका क्षेत्रात कोणत्याही व्यक्तीस अत्यावश्यक कारण/ सेवा वगळता दिनांक १४ मार्च २०२१ पासून रात्री ११:०० ते सकाळी ०६:०० यावेळेत संचार करणेस प्रतिबंध असेल. मात्र यामधून जीवनावश्यक वस्तूंचा (दुध,भाजीपाला,फळे इ.) पुरवठा करणारे, वृत्त पत्र सेवा व अत्यावश्यक सेवा पुरवणारे आस्थापना / व्यक्तींना व त्यांच्या वाहनांना वगळण्यांत येत आहे. तसेच ज्या उद्योगांचे शिफ्टमध्ये कामकाज चालते अशा संबंधित

आस्थापनेवरील कर्मचाऱ्याना व त्यांची ने-आण करणाऱ्या वाहनांना सदर आदेशामधून वगळण्यात येत आहे.

१०) संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

११) पुणे महानगरपालिकेने यापूर्वी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६०, तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र राहील.

सदर आदेश दि. १२.०३.२०२१ पासून पुढील आदेशापर्यंत पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात लागू राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दि. १२.०३.२०२१ रोजी दिलेला आहे.

स्वाक्षरीxxx
( विक्रम कुमार )
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.

३) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.

यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित

निर्गमित

12/3/21

( सुनिल इंदलकर )
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका